३० मे, २०२६

दैनिक धर्मवीर
॥ हिंदुत्वाची धगधगती मशाल ॥
सत्य । निर्भीड । निष्ठावंत । राष्ट्रप्रथम

महाराष्ट्र मुख्य

Master: Editorial Master | Sub Editor Desk | Print + E-paper Package

Top Advertisement

संपादकीय

# शिक्षणाचा झालाय बाजार... रिन काढ पण आपलं लेकरू शिकव गड्या!

**विदारक वास्तव आणि पालकांची ससेहोलपट"शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि जो ते प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही," हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आज आपण फक्त भाषणापुरते मर्यादित ठेवले आहेत का? कारण आज महाराष्ट्राच्या गल्लीबोळात डोकावून पाहिले, तर शिक्षणाचे हे वाघिणीचे दूध आता 'नफ्याचा पांढरा व्यवसाय' बनले आहे. "शिक्षणाचा झालाय बाजार" हे आजच्या काळातील सर्वात मोठे आणि जळजळीत सत्य आहे. आज ज्ञानमंदिरांचे रूपांतर कॉर्पोरेट दुकानांमध्ये झाले असून, सर्वसामान्य पालकांची शिक्षण व्यवस्थेकडून उघडपणे लूट सुरू आहे**

छायाचित्र / प्रतिनिधी

आमदार, खासदार आणि मंत्र्यांचीच दुकानदारी!ही शिक्षण क्षेत्रातील लूट आणि पैशांची वसुली कधी बंद होणार? हा प्रश्न जेव्हा आपण विचारतो, तेव्हा त्याचे उत्तर अतिशय धक्कादायक आहे. आज राज्यातील बहुतांश मोठ्या खाजगी शिक्षण संस्था, नामांकित कॉलेजेस आणि इंटरनॅशनल स्कूल्स कोणाच्या आहेत? तर त्या आमदार, खासदार आणि मंत्र्यांच्याच मालकीच्या आहेत.नेत्यांचेच हितसंबंध: ज्या राजकारण्यांनी गोरगरिबांच्या शिक्षणासाठी कडक कायदे बनवायचे, तेच स्वतः शिक्षणसम्राट बनून बसले आहेत. स्वतःच्या शाळा-कॉलेजांमधून कोट्यवधींचा नफा कमावणारे ये नेते खाजगी शाळांच्या मनमानी फीवर नियंत्रण कसे आणणार?सरकारी शाळा जाणीवपूर्वक दुर्लक्षित: जोपर्यंत सरकारी शाळा ओस पडत नाहीत, तोपर्यंत राजकारण्यांच्या खाजगी इंग्रजी शाळांची दुकानदारी कशी चालणार? म्हणूनच सरकारी शाळांचा दर्जा जाणीवपूर्वक सुधारला जात नाही, हेच आजच्या व्यवस्थेचे सर्वात मोठे पाप आहे.

'मुलींना मोफत शिक्षण' फक्त कागदावरच!सरकार मोठ्या घोषणा करतं, "मुलींना उच्च शिक्षणापर्यंत मोफत शिक्षण देणार!" पण हे मोफत शिक्षण फक्त कागदावरच उरले आहे. प्रत्यक्ष जेव्हा एखादा गरीब बाप मुलीचे ॲडमिशन करायला जातो, तेव्हा त्याचे डोळे पांढरे होतात.छुपी वसुली: फी माफ असली तरी डेव्हलपमेंट फी, लॅब फी, लायब्ररी फी, एक्झाम फी आणि ॲक्टिव्हिटी फीच्या नावाखाली हजारो रुपये उकळले जातात.नियम आणि अटींचे जाळे: सरकारी योजनांच्या क्लिष्ट अटी, कागदपत्रांची जुळवाजुळव आणि सरकारी कार्यालयांचे हेलपाटे मारून सामान्य माणूस थकून जातो. शेवटी मोफतच्या नावाने केवळ निराशाच पदरी पडते.

फीच्या नावाखाली पालकांची वसुली आणि 'शो-बाजी'आजकाल शाळांमध्ये प्रवेश मिळवणे म्हणजे एखाद्या मोठ्या युद्धात जिंकण्यासारखे झाले आहे.डोनेशनचा सुळसुळाट: ॲडमिशनसाठी लाखो रुपयांची लाच 'देणगी'च्या नावाखाली उघडपणे मागितली जाते.उपक्रमांच्या नावाखाली 'इव्हेंट मॅनेजमेंट': शाळा आता ज्ञानदान कमी आणि इव्हेंट मॅनेजमेंट जास्त करतात. रोज नवीन फॅशन! 'कलर डे', 'थीम डे' च्या नावाखाली रोज लाल-पिवळे कपडे खरेदी करायला लावणे, गॅदरिंग आणि फॅन्सी ड्रेससाठी महागडे कपडे भाड्याने आणणे, आणि रोज नवनवीन 'प्रोजेक्ट्स' देऊन पालकांना रात्री जागवायला लावणे, हा शाळांचा रोजचा धंदा झाला आहे

पोराच्या वजनापेक्षा दप्तराच ओझं मोठं!या बाजारीकरणात लहान मुलांचे बालपण पूर्णपणे चिरडले गेले आहे. ५ ते ६ वर्षांच्या चिमुरड्यांच्या पाठीवर ५ ते ७ किलोचे दप्तर असते. शाळांना पुस्तके आणि वह्या विकून पैसे कमवायचे असतात, त्यामुळे प्रत्येक विषयाला टेक्स्ट बुक, वर्क बुक, क्लासवर्क आणि होमवर्क अशा तीन-तीन, चार-चार वह्या पुस्तकांचा भरणा केला जातो. परिणामी, "पोराच्या स्वतःच्या वजनापेक्षा त्याच्या पाठीवरच्या दप्तराचं ओझं मोठं झालं आहे." शासनाचे दप्तराच्या वजनाचे नियम फक्त कागदावरच उरले असून, या ओझ्यामुळे लहान वयातच मुलांचे खांदे आणि मणके दुखू लागले आहेत.

रिन काढ पण आपलं लेकरू शिकव गड्या!या भयानक परिस्थितीमध्ये एका गरीब आणि मध्यमवर्गीय बापाची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. आज समाजात एक विचित्र स्पर्धा सुरू आहे. इंग्रजी माध्यमातून शिकणे ही शिक्षणाची गरज कमी आणि समाजातली प्रतिष्ठा (Status Symbol) जास्त झाली आहे. "माझा मुलगा जिल्हा परिषदेच्या शाळेत जातो" हे सांगायला पालकांना लाज वाटते, आणि "माझा मुलगा कॉन्व्हेंटमध्ये जातो" हे सांगण्यात स्टेटस वाटतो.याच मानसिकतेमुळे आज "सरकारी शाळा फक्त झोपडीत राहणाऱ्यांसाठीच उरल्यात" असे चित्र निर्माण झाले आहे. आता तर झोपडपट्टीत राहणारा किंवा शेतात घाम गाळणारा गरीब बापही स्वाभिमानाने म्हणतोय, "माझं लेकरू इंग्लिश मीडियममध्येच शिकणार!" पण या नादात परिस्थिती नसतानाही, स्वतःच्या पोटाला चिमटा घेऊन, सोसायटीचं, बँकेचं किंवा सावकाराचं 'रिन' (कर्ज) काढून बाप पोराची फी भरतोय. "मी आयुष्यभर उन्हातानात राबलो, पण माझं लेकरू सुटाबुटात साहेब झालं पाहिजे," हीच एक भाबडी आशा त्या बापाला कर्जाच्या खाईत ढकलत आहे.

शासकीय नोकरदारांचे दुटप्पी वास्तवया संपूर्ण व्यवस्थेत सर्वात मोठे दुटप्पी वास्तव शासकीय कर्मचाऱ्यांच्या मानसिकतेत आहे. राज्यात सुमारे १९ लाख शासकीय कर्मचारी आहेत. या सर्वांचे पगार जनतेच्या करातून (Tax) होतात. मात्र, ज्या सरकारी व्यवस्थेचा ते भाग आहेत, त्याच सरकारी शाळांवर त्यांचा विश्वास नाही. या १९ लाख कर्मचाऱ्यांची मुले महागड्या खाजगी इंग्रजी शाळांमध्ये शिकतात, तर दुसरीकडे मराठी शाळा पटसंख्या अभावी ओस पडत आहेत.मराठी भाषेचा पुळका फक्त भाषणापुरता दाखवणारे अधिकारी आणि नेते स्वतःच्या लेकरांना कॉन्व्हेंटमध्ये पाठवतात. जोपर्यंत जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO), किंवा शिक्षण विभागातील मोठ्या अधिकाऱ्यांची मुले स्वतः जिल्हा परिषदेच्या किंवा सरकारी शाळेत शिकत नाहीत, तोपर्यंत या शाळांचा दर्जा सुधारेल कसा? ज्या मराठी मातीच्या जीवावर हे शासकीय कर्मचारी पगार घेतात, त्याच मराठी शाळांना त्यांनी वाऱ्यावर सोडले आहे, हेच आजचे खरे आणि 'मंद' वास्तव आहे

शेवटी...शिक्षण ही फॅशन किंवा मंत्र्यांच्या फायद्याचा व्यापार न बनता, ती प्रत्येक लेकराची खरी ताकद बनली पाहिजे. जोपर्यंत नेते स्वतःच्या फायद्याची ही शिक्षण संस्थांची दुकानदारी बंद करत नाहीत, तोपर्यंत सामान्य माणसाची ही लूट थांबणार नाही. शिक्षण हा व्यापार थांबला पाहिजे, तरच सर्वसामान्य घरातील लेकरू रिन न काढता खऱ्या अर्थाने शहाणं होईल!

विश्वजित पाटील उंडाळकर

मुख्य संपादक